


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

‘ अर्थ एव प्रधानः ’ इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ३०, जानेवारी १९४६ अंक

## —ः साठे बिस्किटें ः—

श्रुसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

——साठे बिस्किट कं., पुणें २

चितळेवाडी येथें गुळाचे घाऊक सौदे

—गुळावरील वहातूक बंदी उठली—

ठिकठिकाणच्या

## गूळ व्यापाऱ्यांसाठी खास सोय

चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि., चितळेवाडी येथें ठिकठिकाणच्या गुळाच्या व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीं गुळाचे सौदे रोज केले जातात, कंपनीच्या गुळाचा कारखाना फार मोठा असून खास सवलतीच्या दरानें व्यापाऱ्यांना एकजात मोठ्या प्रमाणावर गूळ पुरविण्याची सोय केली आहे.

### बाहेरच्या व्यापाऱ्यांस क्रेडीटवर व सवलतीनें माल

कंपनीस परिचित नसलेल्या बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांनीं आपापल्या ठिकाणच्या प्रसिद्ध बँकांकडून आपल्या पतीबद्दल शिफारसपत्रें आणल्यास व्यापाऱ्यांस क्रेडीटवर व सवलतीनें माल देण्याची, व्यवस्था केली जाईल.

### वाहतुकीची खास सोय

चितळेवाडी येथें घाऊक सौदे केल्यास नीरा, लोणंद, अकलूज, नातापुता, डिक्सळ, पंढरपूर, सोलापूर ह्यांपैकीं कोणत्याही ठिकाणीं व्यापाऱ्यांना मालाची डिलिव्हरी दिली जाईल.

चितळेवाडीस नीरा, लोणंद अगर पंढरपूरमार्गें मोटार बसनें जातां येतें व सर्व बसेस चितळेवाडी येथें थांबतात.

पत्ताः—चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि.,
पोस्टः—चितळेवाडी
( जि. सोलापूर )



## सारस्वत
### को—ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३१–१२–१९४५

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,७३,००० |
| ठेवी ... | रु. ५५,५८,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ६०,७३,००० |

सभासदांना जॉईंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट, अगर कॅश क्रेडिट देण्यांत येतें.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस ः दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

लहान मुलांकरितां **आर्को** गोड —एरंडेल— वापरा

ः लक्ष्मी एजन्सी ः
मंगळवार पेठ, कोल्हापूर

# विविध माहिती

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची विशेष सभा

सिंडिकेटच्या ता. १७ फेब्रुवारी रोजीं भरणाऱ्या सभेंत मॅनेजिंग एजंटांचा मासिक अलावन्स सध्यां ६०० रुपये आहे तो १ एप्रिल पासून २,००० रुपये करण्यांत यावा व १००० टन गाळणारी नवी यंत्रासामुग्री सुरू झाली म्हणजे तो ३,००० रुपये करण्यांत यावा, असा डायरेक्टर बोर्डातर्फे ठराव मांडण्यांत येणार आहे. सिंडिकेटचें अधिकृत भांडवल २० लाखांचें १ कोटि रु. करण्यांत यावयाचें आहे. आर्टिकल १० मधील "प्रेफरन्स" व "डिव्हिडंड" ह्या शब्दांचे मध्यें "करमाफ" हा नवा शब्द घालण्यांत येईल.

## ॲटम बॉंबचें गुपित सर्व राष्ट्रांस कळणार

ॲटम बॉंबचें गुपित आंतरराष्ट्रीय करण्याचें ठरवून त्यासाठी एक ॲटॉमिक एनर्जी कमिशन युनायटेड नेशन्सच्या जनरल असेंब्लीनें ठरविलें आहे.

## हिंदुस्थान सरकारच्या अन्नखात्याचे चिटणीस निराश होऊन परतले

हिंदुस्थान सरकारच्या अन्नखात्याचे सेक्रेटरी कंबाइन्ड फूड बोर्डाकडून सयाममधील उपलब्ध धान्याचा पुरवठा मिळविण्यासाठी अमेरिकेस गेले होते, परंतु त्यांच्या कामांत त्यांस अपेक्षेइतकें यश आलें नाहीं.

## अधिक धान्य पिकवा मोहिमेचें यश

मुंबई प्रांतांत १९४१–४२ मध्यें ४०,३५,००० एकरांत कपाशीची लागवड करण्यांत आली होती; १९४५-४६ चें कपाशीखालील क्षेत्र १०,२७,००० एकर भरेल. तंबाखूची लागवडहि २,१०,००० एकरांवरून १,४४,००० एकरांवर आली आहे. 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेखालील पिकांचें क्षेत्र १,९९,६५,००० एकरांचें २,२०,००,००० एकर झालें आहे.

## जपानसाठी अमेरिकेचा कापूस

अमेरिकन सरकार जपानला साडेसात लक्ष गाठी कापूस पाठविण्याची व्यवस्था करीत आहे. कापसाच्या गाठींनीं भरलेलें पहिलें जहाज फेब्रुवारी महिन्यांत अमेरिकेंतून निघेल. हा कापूस फक्त जपान्यांना जेमतेम पुरेल इतकेंच कापड तयार करूं शकेल एवढाच असून गट्टी राष्ट्रांना जरूर पडल्यास त्यांची सोय आधींच पहाण्यांत येईल.

## ८५ कोटि रुपयांच्या नोटा व्यवहारांतून काढल्या

जानेवारी १२ रोजीं सुमारें १६० कोटि रुपयांच्या भारी किंमतीच्या नोटा व्यवहारांत होत्या, त्यांपैकीं सुमारें ८५ कोटि रुपये किंमतीच्या नोटा रिझर्व्ह बँकेकडे वटहुकुमास अनुसरून परत आल्या व त्यांचे बदली १०० रुपयांच्या नोटा देण्यांत आल्या. हिंदी संस्थानें व गोवें येथील अर्जदारांचे अर्ज आतां ह्यापुढें मोठ्या प्रमाणावर येतील. कित्येक मोठ्या नोटा बाहेरच पडणार नाहींत.

## हिंदुस्थानचें सार्वजनिक आरोग्य

लंडनच्या रॉस इन्स्टिटयूटचे डायरेक्टर, डॉक्टर जी. मॅकडोनल्ड ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें हिंदुस्थानचें सार्वजनिक आरोग्य फारच खालावलें असून, आजार व योग्य प्रमाणांत सात्त्विक अन्नाचा अभाव पुन्हा पूर्ववत् मोठ्या प्रमाणावर भासूं लागला आहे.

## पॅलेस्टाईनमधून तेलाचे नळ

सौदी अरबस्तानपासून पॅलेस्टाईनमधून भूमध्य समुद्रावरील एका बंदराला जोडणारा एक हजार मैल लांबीचा तेलाचा नळ घालण्याची परवानगी पॅलेस्टाईनमधील हाय कमिशनर जनरल सर ॲलन कनिंगहॅम यांनीं अमेरिकन मालकीच्या ट्रॅन्स अरेबिअन पाइप लाईन या कंपनीस नुकतीच दिली. ट्रॅन्स अरेबिअन ही अमेरिकन अरेबिअन ऑईल कंपनीची शाखा असून तिची मालकी स्टँडर्ड ऑईल कंपनी ऑफ कॅलिफोर्निया व टेक्सास ऑईल कंपनी ह्यांत विभागली आहे.

## ब्रिटनसाठी अमेरिकन चांदी

डिसेंबर १९४५ व जानेवारी १९४६ या दोन महिन्यांत न्यूयार्कहून लंडनकडे दरखेपेस चारशे अशी एकंदर आठशे टन चांदी आली. तिची किंमत ४५ लाख पौंडांहून अधीक आहे. ही चांदी आणविण्यांत काहीं विशिष्ट हेतु नसून इंग्लंडमध्येंच खपविण्यासाठी ही आयात आहे असें सरकारी रीत्या प्रसिद्ध झालें आहे. तरी पण परदेशांत पाठविण्यासाठी चांदीचे जिन्नस तयार करणाऱ्या बर्मिंगहॅमच्या व्यापाऱ्यांना अधिक चांदी पुरविण्याचें सरकारनें आश्वासन दिलें आहे.

## रशियांतील सोनें

रशियानें आजपर्यंत काळजीपूर्वक राखलेलें सोन्याच्या साठ्याचें गुपित न्यूयॉर्क टाईम्सनें नुकतेंच फोडलें. या वर्तमान पत्राला मिळालेल्या बातमीप्रमाणें, रशियाजवळ सध्या कमीत कमी ५० कोटि ते जास्तीत जास्त २०० कोटि पौंड किंमतीचें सोनें आहे. रशियामध्यें एकोणीस सोन्याच्या खाणी असून त्यांमधून दरसाल ४ ते ७ कोटि पौंड किंमतीचें सोनें निघतें.

## रशियांतील सर्वांत कार्यक्षम रेल्वेस्टेशन

रशियांतील सर्वांत अधिक कार्यक्षम रेल्वे स्टेशनचा मान व्होलोग्डा या रेल्वे स्टेशनला मिळाला. युद्धसमयीं सैन्याच्या आघाडीकडे व पिछाडीकडे या स्टेशननें साडेएकेचाळीस लाख मालाचे डबे रवाना केले. आरखानगेलस्क बंदरांतून आलेली अमेरिकन लढाऊ सामग्री याच स्टेशनच्या मार्फत लाल सैन्याला मिळाली. या स्टेशनवर काम करणाऱ्या लोकांपैकीं निम्म्या स्त्रिया आहेत.

## हिंदुस्थानांत रंगाचें उत्पादन

हिंदुस्थानांतील रंगाचें उत्पादन किती वाढवितां येईल याची शास्त्रीय व औद्योगिकदृष्ट्या संशोधन करून पहाणी करण्याकरितां नेमलेल्या कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला आहे. कमिटीच्या मताप्रमाणें पंधरा ते वीस वर्षांमध्यें पंचवीस कोट रुपये खर्च केल्यास देशाला लागणारा बहुतेक रंग हिंदुस्थानांत पैदा करितां येईल.




सांडू
प्रेग यूटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमीटेड. (चेंबूर, मुंबई)

पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोति चौक, पुणें.

पंढरीनाथ
ब्रिलिअन्टाईन वापरा

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

# "अर्था" च्या संपादकांचें देहावसान !

"अर्था" चे संपादक, प्रो. वामन गोविंद काळे, हे रविवार ता. २७ रोजीं सकाळीं १०-१५ वाजतां पुणें येथील आपल्या "दुर्गाधिवास" बंगल्यांत निवर्तले, हें नमूद करण्यास अत्यंत दुःख होतें. २३ जून, १९४३ रोजीं त्यांच्यावर कॅन्सरच्या दुखण्यासाठी मुंबई येथें शस्त्रक्रिया करण्यांत आली, तिचेमधून ते सुखरूप पार पडले व त्यांची पूर्वीइतकी शरीराची शक्ती राहिली नाहीं तरी त्यांच्या कार्यांत अक्षरशः अखेरच्या दिवसापर्यंत यत्किंचितहि खंड पडला नाहीं. ग्वालेर टेक्स्टाइल लेबर इनकायरी कमिशनचे अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांनीं कमिशनचा एकमताचा रिपोर्ट घडवून आणण्याचें अवघड व शीण देणारें काम १९४४ अखेर पुरें केलें. ईस्टर्न स्टेटस एजन्सीमधील कोरिया संस्थानाच्या आर्थिक पहाणीचें काम त्यानंतर त्यांचेकडे आलें, त्याचीहि त्यांस कमी दगदग झाली नाहीं. हें सर्व चालू असतांना, नित्याचीं सर्व कामें सुरूच होतीं, वैद्यकीय उपचारहि चाललेलेच होते आणि अखेर शरीर अगदीं थकलें, तेव्हांच त्यांचें कार्य थांबलें. २६ जानेवारी रोजीं संध्याकाळीं त्यांनीं रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांसंबंधींचा निवाडा काळजीपूर्वक वाचला आणि अत्यंत महत्त्वाच्या, चलनविषयक एका लिखाणासंबंधीं सूचना दिल्या. रविवारीं सकाळीं शांत चित्तानें त्यांचें परलोकगमन झालें. त्यांच्या देहाचा प्रत्येक कण समाजसेवेसाठी खर्ची पडला आहे. त्यासाठी त्यांस सोसाव्या लागलेल्या यातनांची कल्पना त्यांच्या सन्निध असलेल्यांसहि त्यांनीं कधीहि येऊं दिली नाहीं; तेव्हां दूरच्या लोकांना ती पुरेशी कशी येणार ?

महाराष्ट्राच्या आर्थिक उत्कर्षासाठी त्यांची तळमळ किती होती, हें सुप्रसिद्ध आहे, परंतु त्यासाठी त्यांनीं स्वतः किती स्वार्थत्याग केला आहे ह्याची जनतेस माहिती असणें शक्य नाहीं. ते पहिल्या हिंदी टारिफ बोर्डाचे "अर्थशास्त्रज्ञ" सभासद होते. त्या बोर्डावरील तीन हजार रुपये पगाराची व मानाची जागा, आपल्या अंगीकृत कार्यांत व्यत्यय येईल, म्हणून त्यांनीं आपखुषीनें, सरकार त्यांस जाऊं देत नसतांहि, सोडली. टारिफ बोर्डावरील त्यांच्या अनुभवाचा फायदा हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीस त्यांनीं आपुलकीनें दिला आहे. ग्वालेरच्या अर्थमंत्र्याचें पदहि नाकारण्यांत महाराष्ट्राची सेवा, हेंच एक त्यांचें ध्येय होतें. बनारसच्या विश्वविद्यालयांत त्यांस ओढण्यासाठी पंडित मालवीयांनीं "दुर्गाधिवास" मध्यें स्वतः येऊन अनेकवार आग्रह केलेला आहे. महाराष्ट्रांतील नव्या आर्थिक व औद्योगिक उपक्रमांस त्यांनीं दिलेल्या चालनेचें फळ आज सर्वांस दिसत आहे, व चालावयासहि मिळूं लागलें आहे. ज्या स्वार्थत्यागाचे पायावर ती. दादांनीं डे. ए. सोसायटीचे आजीव सेवक म्हणून पुरें काम केलें, त्याच पायावर त्यांनीं औद्योगिक व्यवसायांच्या उपक्रमांचें पुढारीपण पत्करलें आणि अखेरपर्यंत निरपेक्ष बुद्धीनें मार्गदर्शन केलें. त्यासाठी त्यांस कितीहि झिजावें लागलें व गैरसमज सहन करावे लागले, तरी त्यांचा एका अक्षरानेंहि त्यांनीं कधी उच्चार केला नाहीं.

महाराष्ट्राची अर्थविषयक प्रवृत्ति अत्यंत दुर्बळ असल्यानें ह्या संबंधाच्या कल्पनांचा व वाङ्मयाचा महाराष्ट्रांत अभाव आहे हें जाणून सामाजिक संस्कृतींत ललित वाङ्मयास जसें स्थान आहे, त्याच तोडीचें स्थान अर्थविषयक वाङ्मयास प्राप्त होणें अगत्याचें आहे ह्या जाणीवेनें ही उणीव भरून काढण्याचें "अर्था" च्या संस्थापनेचें "साहस" त्यांनीं १ जानेवारी १९३५ रोजीं केलें. बँकिंग, परराष्ट्रीय व्यापार, उद्योगधंदे, चलन, हुंडणावळ, जकाती, आर्थिक घटना, यांत्रिक सुधारणा, इत्यादी बाबतींत महाराष्ट्रीयांत जागृति निर्माण करून आर्थिक व्यवहारांचें शिक्षण देणें, हा त्या "साहसा" चा मुख्य उद्देश होता. कोणताहि औद्योगिक किंवा व्यापारविषयक प्रश्न उपस्थित झाला असतां, त्या संबंधानें स्वतः योग्य मत बनविण्याची पात्रता जनतेंत उत्पन्न झाली पाहिजे आणि आर्थिक जगांत चाललेल्या घडामोडींचें स्थूल मानाचें ज्ञान प्रत्येक नागरिकास असणें अगत्याचें आहे, ह्या दृष्टीनें आत्मविश्वासानें प्रस्तुत साप्ताहिकाचा उद्योग त्यांनीं आरंभिला. महाराष्ट्रीय जनतेनें त्याचें उत्साहपूर्वक स्वागत केलें व आज इतकीं वर्षें "अर्थ" प्रत्येक बुधवारीं महाराष्ट्रीयांच्या सेवेसाठी प्रसिद्ध होत आला आहे. हिंदुस्थानच्या कोठल्याहि कोपऱ्यांत प्रवासांत ती. दादा असले, तरी अर्थासाठी ४ ओळी तरी लिहून पाठविण्यास ते कधीं चुकले नाहींत. प्रारंभापासूनच त्यांच्या मार्गदर्शनाखालीं "अर्था" चें मामुली काम मी पहात होतों तरी त्याची "जबाबदारी" मजकडे नव्हती. त्यांच्यावरील शस्त्रक्रियेनंतर ती जबाबदारी मजकडे आली, आणि त्यांच्या कसोटीस उतरण्याचा शक्य तो प्रयत्न मी करीत आलों आहें. "अर्था" चें मराठी वाङ्मयांत स्थान मजबूत झाल्याचें पाहून त्यांस समाधान वाटत असे. "अर्था" च्या स्थापनेंतील साहस ही दूरदृष्टीच ठरली, हें जनतेनें "अर्था" चें जें स्वागत केलें, त्यावरून सिद्ध झालें आहे. "अर्था" ची प्रगति हें महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचें उद्बोधक लक्षण आहे. या साप्ताहिकाच्या यशाचें कामीं ज्या अनेकांचा हातभार लागला आहे त्या सर्वांचे वेळोवेळ आभार मानण्याची संधी ती. दादांनीं कधींही सोडली नाहीं. प्रस्तुत समयीं "अर्था" च्या आश्रदात्यांचेसंबंधीं ऋणीपणा व्यक्त करणें मी माझें कर्तव्य समजतों. ती. दादा ह्यांच्या अनुकरणांत जरी थोडेंफार यश आलें तरी तें महद्भाग्य होय !

### हिंदुस्थानाच्या येण्यांत काट—नवे युक्तिवाद

रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटींत दर आठवड्यास कशी मोठी भर पडत चालली आहे, हें "अर्थां" त प्रसिद्ध होणाऱ्या आकड्यांवरून सहज समजून येईल. युद्ध संपून कित्येक महिने लोटले, तरी चलनवाढीस आळा बसलेला नाहीं. ब्रिटिश सरकारासाठी खर्च चालू ठेवून हिंदुस्थान त्या राष्ट्रास एकप्रकारें कर्ज देत राहिला आहे, त्या कर्जाच्या रोख्यांचे तारणावरच रिझर्व्ह बँक नोटा काढीत आहे. हिंदुस्थानाच्या इंग्लंडमधील येण्यांत काट सुचविण्यांत येत असतांना तें येणें वाढूं देण्यांत येत आहे. हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थिति १९४० सालीं बिकट झाली नसती, तर खर्चाच्या वाटणीमध्यें हिंदुस्थानास एवढा दिलदारपणा दाखविण्यांत आला नसता, असें "फिनॅन्शिअल टाइम्स" हें वृत्तपत्र म्हणतें. हिंदी मालास देण्यांत येणारी किंमत वाजवी होती, असें मत ब्रिटिश पार्लमेंटच्या सिलेक्ट कमिटीनें गैरसावधपणानें व्यक्त केलें, परंतु १९३८ च्या स्टर्लिंग पौंडांच्या क्रयशक्तीनें कर्जाच्या रकमेचें मापन केलें, तर ती रकम खात्रीनें कमी भरेल, असेंहि तें पत्र म्हणतें. एकीकडे हिंदी येण्यांत वाढ व चलनविस्तार हीं चालू असतांना त्या कर्जांत काट सुचविण्याचें कामहि त्याच वेळीं चालू आहे, हें चमत्कारिक नाहीं काय ? इंग्लंडचें देणें कमी करण्यासाठी नवे युक्तिवाद पुढें येत आहेत.

## सहकारी इन्स्टिट्यूटच्या जिल्हाशाखांची पुनःस्थापना

( लेः—विनायक गणेश तिखे, ४२ बुधवार, पुणें. )

सहकारी इन्स्टिट्यूटच्या जिल्हाशाखा बंद होऊन पांच सहा वर्षे झालीं. या जिल्हाशाखा बंद होण्यामध्यें वेगवेगळ्या लोकांचीं वेगवेगळीं धोरणें होतीं, तीं सर्व त्यावेळीं एके ठिकाणीं आलीं, आणि त्याचें पर्यवसान जिल्हाशाखा बंद होण्यामध्यें झालें. जिल्हा-शाखा बंद होण्यामध्यें त्यावेळीं कोणाचें काय साधलें अगर सहकारी चळवळीचें अगर सहकारी संस्थांचें काय हित साधलें गेलें हें अजूनही सांगतां येणार नाहीं. एवढें मात्र खरें कीं, आज सुद्धां जिल्हाशाखांची उणीव भासल्याशिवाय रहात नाहीं आणि जिल्हाशाखांमुळें इन्स्टिट्यूटच्या पूर्वीच्या वैभवाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

जिल्हा सुपरवायझिंग बोर्डें स्थापन झाल्यामुळें जिल्हा इन्स्टिट्यूटची आवश्यकता नाहीं असें एक त्यावेळीं प्रमुख कारण सांगण्यांत आलें होतें. या जिल्हा सु. बोर्डांकडून लोकांच्या आशा व आकांक्षा भागविल्या जातील, अशीहि ग्वाही त्यावेळीं देण्यांत आली होती. परंतु आज अनुभव मात्र अपेक्षेप्रमाणें येत नाहीं. सहकारी चळवळीसंबंधानें लोकांमध्यें आत्मीयता उत्पन्न करणें, विश्वास उत्पन्न करणें या गोष्टी जिल्हा इन्स्टिट्यूटप्रमाणें हीं जिल्हा बोर्डें उत्पन्न करूं शकत नाहींत असें म्हटलें तर तें चुकीचें होणार नाहीं. अनुभवही असाच आहे. या कांहीं बोर्डांचे अध्यक्ष असिस्टंट रजिस्ट्रार आहेत. सेक्रेटरी जिल्हा सहकारी ऑफिसर असतात. या संस्थेच्या दोन प्रमुख कार्यचालक जागा सरकारी अधिकाऱ्यांकडे असतात. सरकारी अधिकारी कितीही चांगला असला, तरी त्याच्या इच्छेला मर्यादा असतात. त्याच्यावर स्वतःच्या कामाच्या जबाबदाऱ्या असतात. खात्याचीं धोरणें सांभाळावीं लागतात. जिल्हा सु. बोर्डांच्या कामकाजाकडे जरा बारीक आणि अभ्यासू नजरेनें पाहिलें तर हीं बोर्डें स्थापन करण्यामध्यें जो हेतू होता, तो साध्य झालेला आहे असें दिसत नाहीं. त्याच-प्रमाणें पुढेंही साध्य होईल अशी आशा करण्यास जागा आहे असें दिसत नाहीं.

जिल्हा इन्स्टिट्यूट नाहींशा झाल्यामुळें चळवळीसंबंधानें लोकप्रियता नाहींशी झाली. लोकांच्या कार्याला वाव नाहींसा झाला, उत्साह नाहींसा झाला. नवीन नवीन माणसें पुढें येण्याचें साधन नाहींसें झालें आणि सर्वांत वाईट गोष्ट ही झाली कीं, लोकांच्या तक्रारीला, लोकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचें लोकांच्या विश्वासाचें असें ठिकाण नाहींसें झालें.

जिल्हा इन्स्टिट्यूट नाहींशा झाल्या, सहकारी इन्स्टिट्यूटची घटना बदलली. त्यामुळें सहकारी चळवळ ही लोकांकरितां आहे, ती लोकांनींच चालविण्याकरितां आहे ही विचारसरणी नाहींशी झाली. इन्स्टिट्यूटला किंमतवान हिऱ्यासारखें स्वरूप प्राप्त झालें आहे, सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीनें सहकारी इन्स्टिट्यूटचा उपयोग जवळजवळ नाहींसा झाला तसेंच या सर्व घटनेमुळें इन्स्टिट्यूटच्या पाठीमागचा लोकसंग्रहहि नाहींसा झाला.

आतां महायुद्ध संपलें आहे. युद्धानंतरच्या अनेक आर्थिक योजना अंमलांत यावयाच्या आहेत. त्यामध्यें सहकारी चळवळीला व सहकारी संस्थांना बरेंच कार्य करावें लागणार आहे. अशा नव्या मनूच्या वेळीं नवे कार्यकर्ते लागतील. लोकांचा विश्वास लागेल. नवे कार्यकर्ते, त्यांना कार्याप्रमाणें शिक्षण, कार्याला वाव, लोकसंग्रह आणि लोकविश्वास संपादन करावयाचा असेल तर त्याकरितां इन्स्टिट्यूटच्या जिल्हाशाखा स्थापन व्हावयास पाहिजेत व त्या पूर्ववत् कार्यक्षम व्हावयास पाहिजेत यांत संशय नाहीं.

आतां काळ बदलला आहे. लोकांचीं मनें बदललीं आहेत. या वेळीं प्रयत्न झाल्यास त्याला यश येण्याचा संभव आहे. हें सर्व लक्षांत घेऊन इन्स्टिट्यूटच्या गेल्या ता. १७-१२-४५ च्या सर्वसाधारण सभेंत विचाराकरितां या बाबतींत एक ठराव दिलेला होता व तो एकमतानें मंजूरहि झाला आहे. जिल्हा शाखा स्थापन करण्यासबंधाचा सर्वांगीण विचार करण्याचें कार्य सदर सर्वसाधारण सभेनें इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळाकडे सोपविलें आहे.

सहकारी संस्थांनीं आणि सहकारी जळवळींतील नव्या-जुन्या कार्यकर्त्यांनीं या महत्त्वाच्या बाबीकडे अवश्य लक्ष द्यावें आणि जिल्हाशाखा पुन्हां स्थापन होतील यासाठीं जरूर लागणारे प्रयत्न करावेत आणि एकमेकांस सहाय्य द्यावें; तसेंच यासंबंधींच्या आपल्या सूचना आणि आपले विचार इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळाकडे पाठवाव्यात व पूर्ववत् जिल्हा शाखा स्थापन होतांचें अशा जोराचा प्रयत्न करावा अशी विनंति आहे.


उद्योगधंदे व व्यापाराची प्रगती यासाठीं

बँक ऑफ पूना

लिमिटेड

यांचे मार्फत आपले बँकिंगचे व्यवहार करा.

—हेड ऑफिस—

४५५ रविवार, फडके गेटासमोर, पुणें २

…शाखा…

(१) सरदार विंचूरकर वाडा,
सदाशिव पोस्टासमोर, पुणें २.

(२) रामभगत पन्नालाल सोमाणी,
यांचे माडीवर
घ. नं. ११, भवानी पेठ, पुणें २.

—मॅनेजर

# भावी काळांतील ग्रामसंघटना

( मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचे अध्यक्ष, सर जनार्दन मदन ह्यांनीं मुंबई नभोवाणीवरून केलेलें भाषण को. क्वार्टर्लींत प्रसिद्ध झालें, त्याचा अनुवाद )

कांहीं महिन्यांपूर्वी " तलवार " आगबोटीवरील खलाशांमध्यें लावलेल्या ' युद्धोत्तर आधुनिक ग्रामजीवन ' विषयक नमुन्यांच्या चढाओढी पाहाण्याचा योग आला होता. त्या प्रसंगीं खेड्यांतून आलेल्या होतकरू तरुण खलाशांनीं जे नमुने केले होते ते प्रशंसनीय होते. शहरांशीं संबंध आल्यामुळें किंवा दुसऱ्या देशांत गेल्यावर उत्कृष्ट आखणीचीं शहरें व गांवें पाहावयास मिळाल्यामुळें त्यांच्या दृष्टिकोनांत कसा बदल घडला होता, हें कोणाच्याही लक्षांत आलें असतें. त्यांनीं जीं नमुनाचित्रें बनविलीं होतीं, त्यांमध्यें चांगली आखणी, उत्तम प्रकारचे रस्ते, दळणवळणाचीं साधनें, आरामशीर घरें, विजेचे दिवे आणि एका नमुन्यामध्यें तर घरांघरांतून टेलिफोनची सुद्धां व्यवस्था केलेली होती. त्यां तरुणांची अशी आकांक्षा होती, कीं ह्यापैकीं कांहीं सुखसोई तरी आपल्या गांवीं असाव्यात ! त्यांच्या ह्या आकांक्षा खेड्यांतील आर्थिक स्थिति पुष्कळ सुधारण्यावर अवलंबून असल्यामुळें, सध्यां चालू असलेली गरिबीची जाचणूक जोंपर्यंत संपली नाहीं तोंपर्यंत फारशी प्रगति होऊं शकणार नाहीं, हें उघडच आहे. म्हणून ग्रामसुधारणेची इच्छा असणारांना सर्वांचें मूळ म्हणून आर्थिक प्रगतीकडे प्रथम लक्ष द्यावें लागणार आहे.

राष्ट्राच्या उत्पन्नांत शेतकीच्या द्वारें कशी भर टाकतां येईल आणि त्यासाठीं कोणत्या गोष्टी साहाय्यभूत होऊं शकतील इकडे लक्ष देणें जरूर आहे. ह्यांमध्यें शेतकामांत यंत्रसाहाय्य, रासायनिक खतांचा उपयोग, जमिनी धुपून जाऊं नयेत ह्यासाठीं योजना, विहिरी व बंधारे इत्यादि जमिनींच्या सुधारणेच्या निरनिराळ्या योजना, इत्यादि गोष्टी येऊं शकतील. मात्र केवळ उत्पादनाची वाढ हेंच ध्येय नव्हे. खरोखर तें एक केवळ साधन आहे. शेतकऱ्यांचें जीवन स्थैर्याचें, सुखाचें व्हावें, ह्या ध्येयाचें तें एक साधन आहे.

प्रथम आपण आर्थिक सौख्याचा विचार करूं. उत्पादनाच्या मानावर हें अवलंबून असलें तरी प्रत्येक व्यक्तीच्या वांट्यास उत्पन्नाची येणारी वांटणी ही उत्पादन कोणत्या पद्धतीखालीं चालू आहे आणि या आर्थिक प्रयत्नांचें फळ वाटण्याची व्यवस्था काय केली आहे ह्यांवरून अवलंबून रहातें. शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनांत ह्यापुढें न्याय्य तत्त्वावर आधारलेल्या वांटणी पद्धतीस प्राधान्य मिळालें पाहिजे. जमिनीचा मालक-शेतकरी आणि सरकार, मालक आणि कुळें आणि जमिनीचा मालक व मजूर ह्यांच्या संबंधांत हें सूत्र राखावें लागेल. म्हणजे मग जमीन कसणाराला आपल्या कामाबद्दल खरी कळकळ वाटूं लागेल. ह्या न्याय्य वाटणीचे अभावीं यंत्रांचें साहाय्य व शास्त्रांची मदत असून देखील, आपण उत्पादन वाढवूं शकूं, असा भरंवसा वाटत नाहीं.

दुसरी एक बाजू ह्यावेळीं आपणांस विचारांत घ्यावी लागेल, ती म्हणजे हल्लीं प्रचलित असलेल्या शेतकी व्यवसायाचें अत्यंत लहान प्रमाण. हल्लीं व्यक्तिगत शेतीचें क्षेत्र इतकें लहान आहे कीं त्या पायावर शेतकी किफायतशीर कधींहि होणार नाहीं, अशी भीति वाटते. शेतकीची सुधारणा करणारांपुढें मोठा प्रश्न असा आहे कीं, जमिनीचें वंशपरंपरागत मालकी किंवा इतर हक्क न दुखावतां नवीन योजना कशा अंमलांत आणतां येतील. मला असें वाटतें कीं सहकारी चळवळीनें त्यांतून मार्ग काढतां येईल. त्यासंबंधांतील शक्यतांची कल्पना आपल्या देशांत अद्याप फारशी पटलेली नाहीं. सहकारी तत्वावर जमिनीची लागवड, तुकड्यांचें एकत्रीकरण, एकत्रित पेरणीची योजना इ. गोष्टींमध्यें सहकारी तत्व लागूं करतां येईल ह्या दिशेनें प्रयत्न केला नाहीं, तरी इतर गोष्टींना सुद्धां हें तत्त्व उपयोजतां येण्याची शक्यता आहे. माझ्या मनापुढें प्रत्येक उत्कर्षवादी खेड्याची सहकारी पद्धतीवर असणारी स्वतःची व्यवस्था असावी असें आहे. बियाणांची लागवड, खतांचा सांठा, उपकरणांचा कारखाना, धान्याचें कोठार, ग्राहकांसाठीं भांडार, बाजारकेंद्र, वखारी, खेडेगांवच्या बँका इ. व्यवहार सहकारी पद्धतीनें घडला पाहिजे. पुरवठा, उठाव, भांडवल पुरवठा, सुधारलेल्या पद्धतीचें उत्पादन, ह्या सर्वांचे बाबतींत सहकाराचा अवलंब नसेल तर स्वतःची जमीन स्वतः करणाऱ्या शेतकऱ्यांचे देशांत प्रगति घडवून आणणें कठीण जाईल.

परंतु मनुष्यप्राण्याचें जीवन केवळ आर्थिक व्यवहारांपुरतेंच मर्यादित नाहीं. त्यामुळें केवळ उत्कृष्ट शेती व उत्कृष्ट धंदा एवढ्यानेंच खेड्याची अपूर्व सुधारणा होणार नाहीं. रहाणीमध्यें सुधारणा घडवून आणण्यास त्यांचा अर्थातच मोठा उपयोग आहे.

हल्लींची खेड्यांची दुर्दशा केवळ भौतिक सुखाच्या अभावामुळेंच झाली आहे असें नव्हे. त्यांचा सांस्कृतिक दर्जा नाहींसा झालेला, समष्टीजीवन संपुष्टांत आलेलें, तटांमुळें ( पक्षांमुळें ) विदारण झालेलें, कला व हुन्नर नाश पावलेलीं अशी स्थिती आहे. अशावेळीं स्त्री-पुरुषांच्या कर्तृत्वाला आवाहन करणारें कोणतेंच महत्त्वाकांक्षी ध्येय त्यांचे डोळ्यापुढें नाहीं !

खेडेगांवांत व्यक्तींची सहकारी गटांमार्फत संघटना झाल्याशिवाय खेड्यांची आर्थिक प्रगती होऊं शकेल असें मला वाटत नाहीं. त्या प्रगतीसाठीं त्यांच्या संपूर्ण जीवनाची काळजी वाहाणाऱ्या ' ग्राम पंचायती ' असाव्या लागतील. समाजाच्या सर्व अंगांची प्रातिनिधिक अशी ही ग्रामपंचायत स्थानिक लोकांना जबाबदार असेल. त्याचप्रमाणें मार्गदर्शन व मदत ह्यासाठीं जिल्हा किंवा प्रांतिक मध्यवर्ती केंद्राशींही तिचा संबंध राहील. आरोग्य, स्वच्छता, रस्त्यांची सुस्थिति, पाण्याची स्वच्छता, माणसांच्या आणि जनावरांच्या रोगांचें प्रतिबंधन इ. रोजच्या जीवनाच्या गरजा, ह्या संस्थेस पुरवाव्या लागतील. किरकोळ दिवाणी तक्रारींचा त्वरित निकाल लावणें हें ह्या मर्यादित अधिकाराच्या संस्थेला शक्य आहे. " उशीरा न्याय म्हणजे अन्याय " ह्या दृष्टीनें वरील सभेस न्यायदानाचा अधिकार देणें सामाजिक जीवनास हितावहच ठरेल.

शिक्षण हा प्रगतीचा पाया असल्यामुळें शाळा ह्या हल्लींप्रमाणें निःसत्व न राहातां सांस्कृतिक जीवनाचीं तीं केंद्रें बनावीं. तिच्यामध्यें, प्रत्यक्ष काम करण्याच्या कलेबरोबरच सहकार्यानें काम करण्यासहि शिकवलें जावें. तिला जोडून छोटेंसें उद्यान, एक प्रशस्त हॉल, स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेच्या प्रसारासाठीं वाचनालय इ. व्यवस्था असाव्यात. त्याचप्रमाणें जीवन व त्याचे व्यावहारिक उद्योग यांचीं सांगड कशी घालावी ह्याची माहिती प्रसृत करण्याचें तें एक उत्कृष्ट साधन होईल.

शहरांमध्यें आपलें जीवन घालविणारे कांहीं लोक खेडेगांव म्हणजे लहान लहान खोपट्यांचा जमाव येवढीच कल्पना करतात.

यापुढें खेडें हें ' शहरांतील घाण वस्तीचा खेडेगांवी नमुना ' राहूं नये. निसर्गानें खेड्यांच्या आसपास विखुरलेलें रम्य सौंदर्य वाया जाणार नाहीं याची आपण काळजी घेतली पाहिजे. हवेशीर, चांगल्या बांधकामाची आपण कौलारू घरें बांधूं शकूं आणि आसपास छोट्या बागा, गुरांचे तबेले ह्यांची सोय करूं शकूं. सांड-पाणी व मलमूत्र हीं वाहून जाण्याचीहि व्यवस्था करतां येईल. आपल्या देशांतील स्वच्छ हवा आणि प्रकाश ह्यांचा विचार केला तर हीं खेडीं विधायक कार्यासाठी आनंदानें जीवन खर्चणारांचीं, आरोग्य पसरविणारीं केंद्रें बनणें सहज शक्य आहे.

शेजार शेजारच्या गांवांना मिळून दवाखान्यांचीही सोय करतां येईल. घरांची सुधारणा व स्वच्छता ह्यांकडे लक्ष दिलें तर वैद्यकीय मदत ही दाट वस्तीच्या शहरांचे मानानें कमी लागेल. शुद्ध पाण्याचा पुरवठा, मच्छरादि जंतूंच्या उत्पत्तीस प्रतिबंधक ड्रेनेजची उत्तम व्यवस्था आणि समतोल व पूर्ण आहार ह्या गोष्टी खेड्यांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत. यावेळीं सकस आहाराविषयींहि सांगणें जरूर आहे. हल्लीची मुख्य अडचण म्हणजे लोकांना पोटभरहि अन्न मिळूं शकत नाहीं व ज्यांना पुरेसें जेवण मिळतें तें पाहिलें तरी स्थानिक उत्पादनाचा भाजीपाला, मांसे, आणि दुधाचे निरनिराळे पदार्थ इत्यादींची त्यांत भर टाकतां येईल.

वरील गोष्टींचा निष्कर्ष असा कीं, शेतकऱ्यांना केवळ जमिनीवर अवलंबून राहून चालणार नाहीं. विविध पिकांची शेती, किंवा शेतकऱ्यांनीं शेतीशिवाय अन्य धंदे करणें, ह्या गोष्टी केल्याखेरीज कोणत्याही खेड्याची आर्थिक भरभराट होणार नाहीं. पूर्वी आपल्या खेड्यांमध्यें शेती व उद्योगधंदे ह्यांचा समतोलपणा राहात असे. अनेक गोष्टींमुळें त्यामध्यें खंड पडला. पण तो विषय माझ्या प्रस्तुत कक्षेबाहेरचा आहे. त्यांतील कांहीं गोष्टींचें सरकारला आज सुद्धां नियमन करतां येईल. आणि तें केलें तर विविध पिकांच्या शेतीला उत्तेजन देणें, मच्छेमारीची स्थानिक व्यवस्था करणें, विशेषत: स्थानिक मालावरच चालणाऱ्या खेडेगांवी उद्योगधंद्याला उत्तेजन देणें, तसेंच दूध व त्यापासूनचे इतर पदार्थ मिळण्यासाठी गुरांच्या उत्तम निपजीसाठी सवलती देणें, इ. गोष्टी कराव्या लागतील. वरील प्रयत्नांतून भावी काळांतील खेड्यामध्यें उद्योग व जिवंतपणा निर्माण होईल.

खेड्यांतील समाजाची घडी विसकटणें, गावांत तट पडणें, ह्या गोष्टी आळसांतून निर्माण होतात. सुस्ती, आळशीपणा हीं जुन्या खेड्यांचीं वैशिष्ट्यें नाहींशीं झालीं पाहिजेत.

माझ्या कल्पनेपुढें असणाऱ्या खेड्यांमध्यें स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनेंच जबाबदाऱ्या पार पाडतील. ह्यासाठीं स्त्री शिक्षणाचा फैलाव ही गोष्ट गृहीतच आहे. खेड्यांतील मुलींच्या शाळेला मुलांच्या शाळेइतकेंच महत्त्व असलें पाहीजे. आणि मग अडचण निर्माण करणाऱ्या पडद्यासारख्या रूढ चाली नाहींशा होतील. शहरांतील स्त्रियांप्रमाणें खेडेगावांतील स्त्रियाहि पुरुषांच्या बरोबरीनेंच समाजकार्यांत पुढें येतील आणि मग समाजाच्या प्रगतीसाठी परिणामकारक गोष्टींना आरंभ करतां येईल. तसेंच शिशुसंगोपन व बाळंतपणाची व्यवस्था ह्यांतही हात घालतां येईल.

खेड्यांनीं केवढें मोठें राष्ट्रीय महत्त्वाचें विधायक कार्यक्षेत्र निर्माण केलें आहे! कर्तृत्व आणि बुद्धिमत्ता खेड्यांतून आतां नाहींशी झालेली आहे ती त्यांना परत मिळाली पाहिजे. ह्या गोष्टींना वेळ लागणें स्वाभाविक आहे. परंतु मध्यंतरीच्या काळांमध्यें ज्यांना खेड्याची उन्नति करण्याची इच्छा आहे, त्यांनीं आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्र नेमून घेऊन कार्याला सुरवात केली पाहिजे. विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं याचा विचार करून सुट्टीसाठी योजना आंखली पाहिजे. केवळ तरूण मुलेंच कार्य करूं शकतील असें नाहीं तर मुलींनासुद्धां हें करतां येईल. आपलें काम वाया जाईल म्हणून भिण्याचें कारण नाहीं. त्यांच्या हातून सेवाधर्माच्या वृत्तीनें जें अल्पस्वल्प कार्य निर्माण होईल त्याबरोबरच त्यांच्या रम्य आणि उदात्त अनुभवांतही भर पडेल. अशा कामामध्यें जर कोणा होतकरूंना मदत अथवा मार्गदर्शन ह्यांची आवश्यकता असेल तर मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट मोठ्या आनंदानें शक्य तें सहाय करण्यास तयार होईल.

### कमिट्यांवरील सभासदांवर निर्बंध घालण्याची आवश्यकता

अलीकडे कोणत्याहि संस्थांमधून व्यवस्थापक कमिटीवर पंच म्हणून निवडणुकीसाठी फार लोक खटपट करतात व प्रसंगविशेषीं काम व पैसाहि कल्पनांतीत खर्च करतात. पण त्या मानानें निवडून आल्यानंतर कार्य करण्याच्या बाबतींत मात्र बुद्धी, श्रम व पैसा खर्च करीत नाहींत ही खेदाची गोष्ट आहे. निवडणुकींची चुरस ही चांगली आहे, यांत संशय नाहीं. पण त्यांत लायक सभासद पडत असतील तर. परंतु त्या बाबत अनुभव मात्र उलट आहे. ह्या बाबत लायकीची निश्चित अट नसल्यामुळें वाटेल तो मेंबर वाटेल त्या लायक मेंबराशीं निवडणूक स्पर्धा करूं शकतो आणि लायक इसमांच्या हातींच संस्थेची सत्ता जात नसल्यामुळें संस्था बुडण्याचा संभव असतो. संस्थेची मदार ज्या नोकरांवर असते त्यांना नोकरीची शाश्वति असणें आवश्यक आहे. सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. द. आ. पाटील, ह्यांनीं रजिस्ट्रारकडे एक पत्र पाठवून ह्याविषयीं कांहीं सूचना केल्या आहेत, त्या अशा:—

"सहकारी संस्था चांगल्या चालवून त्या टिकाव्यात या करतां लायक नोकरवर्ग नेमण्याची व्यवस्था झाली पाहिजे व त्यांचें भवितव्य हें चांगल्या हुकमतीखाली ठेवून, त्यांना संरक्षण मिळून शाश्वति व उत्तेजन मिळेल अशी व्यवस्था झाली पाहिजे.

"नंतर ज्यांच्या हुकुमतीखाली हा स्टाफ राहणार ते व्यवस्थापक लायक असणें जरूर आहे. त्या साठी त्यांची लायकी ठरविली पाहिजे. (उदाहरणार्थ लवाद आलेले नसावे. थक बाकीदार नसावें. प्रतिस्पर्धी धंदा नसावा व शिक्षणाचा कस हा थोड्याफार प्रमाणांत असावा व ज्या बाबतची संस्था असेल त्यासंबंधीं तो काय मदत करतो हें पाहण्यासाठी त्याचीहि अट असावयास पाहिजे.) अशापैकीं लायकी न ठेवली तर कांहीं लोक इकडे राजरोसपणें बोर्डावर निवडून येतात. पुढें संस्थेच्या बाबत मग ते खटपट करीत नाहींत. केली तरी ती कोणी ऐकत नाहींत. संस्थेचा खाजगी उद्योगधंद्यास पोषक परंतु संस्थेस घातुक असा उपयोग करून घेण्यांत येतां कामा नये.

"यासाठी ज्या मुख्य हेतूकरतां ती संस्था असते ते हेतू तडीस नेण्यासाठी प्रथम चालक वर्ग तिचा फायदा घेतील अशी व्यवस्था असावयास पाहिजे व त्यासच चालक होता येईल अशी सोय असावी. म्हणजे चांगल्या बाबींत अहंमहिका लागेल व लायक व खरोखरीचे लोक त्यांत येतील व संस्था भरभराटीस येण्यास मदत होईल. म्हणून शिक्षणाची लायकी व ज्या कारणासाठी संस्था आहेत त्याचा पुरेपूर फायदा किंवा त्याना मदत करणारे जे मेंबर्स असतील त्यांनाच वाव मिळावा म्हणून सर्क्युलरद्वारां सक्ती केली जाईल व पोटनियमही त्याच दिशेनें दुरुस्त होतील अशी व्यवस्था झाल्यास अज्ञानाचा फायदा गुंड लोक न घेतां सहकार्य हे उठावदार, टिकाऊ व भरभराटीचें दिसेल."

श्री. पाटील ह्यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाचा अनुभव बऱ्याच संस्थांत येत आहे, ह्या दृष्टीनें त्यांच्या सूचनांचें महत्त्व आहे.

# स्फुट विचार

## " नाममात्र " सभासदांस " पीक-कर्जे "

बॉबे डेट रिलीफ ॲक्टाप्रमाणें ज्यांचीं कर्जे तपासून तोडण्यांत आलीं आहेत, किंवा येत आहेत अशा व्यक्तींच्या व कर्जे देणाऱ्या बँकांच्या दृष्टीनें "पीक-कर्जे" देण्याच्या व्यवस्थेचा तपशील अत्यंत महत्त्वाचा आहे. हें काम सहकारी बँकांनीं करावें असें सरकारचें म्हणणें आहे, परंतु त्यासंबंधांतील जबाबदारी उचलण्यांत काय अडचणी येतील, ह्याची वाटाघाट करण्यांत बँकांचे चालक गुंतले आहेत, असें दिसतें. ज्यांच्या तडजोडीच्या अर्जांचा पुरा निवाडा झालेला नाहीं, अशांना कर्ज नाकारणें योग्य होणार नाहीं. बँकेच्या शाखेपासून दूर असलेल्या ठिकाणच्या नाममात्र सभासदांस कर्ज दिल्यास त्यावर देखरेख ठेवणें कठीण जाईल. ह्यासाठीं, शक्य तेवढ्या नव्या सोसायट्या काढून व कांहीं चालू संस्थांना बँकेप्रमाणें कर्ज देण्यास परवानगी देऊन ( बँक त्यांना पैसा पुरवील ) हा प्रश्न सोडवावा किंवा काय, अशी एक सूचना पुढें आली आहे. " नाममात्र " सभासदांना द्यावयाच्या " क्रॉप फिनॅन्स " मध्यें बँकांनीं किती पैसा गुंतवावा, हाहि एक महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या व्यवहाराचे संबंधांत सहकारी खात्याचें सहाय किती मिळणार आहे, ही गोष्टहि स्पष्ट झाली पाहिजे. बँकांस येणाऱ्या जादा खर्चापैकीं सरकार किती सोसण्यास तयार होईल, बँकांवरील जबाबदारी किती मर्यादित होईल आणि वसुलीचें काम कार्यक्षम होण्याचे दृष्टीनें व्यवस्था काय करण्यांत येईल, ह्यांवर " पीक-कर्जा"-ची योजना यशस्वी होणें अवलंबून राहील, हें उघड आहे.

---

## सुधारणांच्या योजनेसाठी कराचा बोजा

प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा नुकतीच भरली होती, तिचेमध्यें प्रारंभीं भाषण करतांना प्रांताधिपति, सर जॉन कॉलव्हिल, ह्यांनीं ( १ ) अन्नपुरवठा व ( २ ) युद्धांतून परतलेल्या सैनिकांची त्यांस मिळालेला अनुभव व शिक्षण ह्यांस साजेल अशी सोय ह्या दोन प्रश्नांचें महत्त्व प्रतिपादन केलें. राजकीय प्रश्नामध्यें जनता मग्न होऊन गेल्यामुळें कदाचित अन्नपुरवठ्याच्या मुलग्राही प्रश्नाकडे तिचें दुर्लक्ष होण्याचा संभव आहे, अशी भीति त्यांनीं व्यक्त केली. शेतीची व इतर सुधारणा ह्यांसाठीं पुष्कळच पैसा लागेल, तो उभारण्याचें एकमेव साधन म्हणजे कर आकारणी हें होय आणि पूर्वीच्या मानानें आतां फारच मोठ्या प्रमाणावर करभार सोसण्याची हिंदी लोकांस संवय करावी लागेल, अशी त्यांनीं सूचना देऊन ठेवली. सामाजिक व आर्थिक प्रगति त्याखेरीज अशक्यप्राय आहे. हिंदुस्थानांतील कराच्या बोजाच्या मानानें पाश्चिमात्य देशांतील कराचा बोजा कितीतरी अधिक असल्यामुळेंच तेथील रहाणीचा दर्जा इतका सुधारूं शकला व हिंदुस्थानासहि तोच मार्ग आक्रमावा लागेल, असा प्रांताधिपतींचा युक्तिवाद होता. विक्रीवरील कराची योजना मुंबई सरकारनें केली, परंतु तिचेविरुद्ध काहूर माजलें त्याचा उल्लेख त्यांनीं केला व सुधारणेच्या योजनांस लागणाऱ्या पैशाचा पुरवठा होण्याचें महत्त्व कित्येक लोकांना अद्याप पटलेलें नाहीं असा त्यावरून त्यांनीं निष्कर्ष काढला.

---

## विनियोगाचें धोरण कोण आखणार?

पाश्चात्य देशांचे मानानें हिंदुस्थानांत कराचा बोजा फारच कमी आहे, असें सांगण्यांत येतें तेव्हां दोन्ही ठिकाणच्या लोकांची तुलनात्मक प्राप्ती विचारांत घेतलेली नसते, असेंच बहुधा आढळतें. दरिद्री मनुष्यास, त्याच्या किमान गरजा भागल्याखेरीज, कर देण्याची पात्रता कशी येणार ? हिंदी लोकांच्या करांचे उत्पन्नावर चालविण्यांत येणारी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांचा खर्च, हिंदी आर्थिक परिस्थितीस अनुसरून, योग्य काटकसरीचा असेल तर फलदायी सुधारणांसाठीं जादा कर देण्यास कोणीहि विरोध करण्याचें कारण नाहीं. परंतु कराच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याचें धोरण आखण्याचें काम लोकमतानुवर्ती मंत्रिमंडळांकडे नसेल तर कराची आकारणी लोकप्रिय होणें शक्य नाहीं. नवीन कर सहसा कोणासच नको असतात आणि त्यांचा विनियोग खऱ्याखुऱ्या लोकप्रतिनिधींच्या हातीं नसेल तर ते कर अधिकच अप्रिय होतात. विक्रीवरील कराची योजना नवीं मंत्रिमंडळें येईपर्यंत स्थगित करावी अशी लोकांची मागणी आहे तिची विचारसरणी वरीलप्रमाणें आहे. सुधारणांच्या योजनांसाठी चालू सरकारला अधिक पैसा जरूर पाहिजे. परंतु तो देण्यास लोक उत्सुक दिसत नाहींत, हें ह्यासाठीच.

---

## श्री. मुरारजी देसाई ह्यांची पूर्वसूचना

लोकमतानुवर्ती मंत्रिमंडळें प्रांतांत स्थापन झालीं, तरीहि करांचा बोजा कमी न होतां वाढेल, हें लोकांना पूर्णपणें माहीत आहे. मुंबई प्रांताचे एक माजी मंत्री, श्री. मुरारजी देसाई, ह्यांनीं ह्या प्रश्नाचा उल्लेख नुकताच करून करवाढीची पूर्व सूचना देऊन ठेवली आहे. ज्यांचेवर कर बसविणें ज्यास्त युक्त आहे अशांवरच तो मोठ्या प्रमाणावर बसविला जाईल व त्याचा फायदा सर्व जनतेस मिळेल असें सांगून, काळ्या बाजारांत पैसा मिळवून गबर झालेल्या धनिकांना त्यांनीं आगामी करभाराची जाणीव करून दिली. सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चाची तरतूद समाजानेंच केली पाहिजे हें उघड आहे. जितका समाज मागसलेला, तितकी अशा खर्चाची आवश्यकता जास्त परंतु कर देण्याची लोकांची पात्रता मात्र कमी, अशी अडचणीची परिस्थिति असते. अशा वेळीं, समाजांतील सुस्थितीमधील व संपन्न घटकांसच कराचा मुख्य भार उचलावा लागतो आणि लोकमतानुवर्ती सरकार हें अप्रिय कार्य जास्त निर्भयतेनें करूं शकतें हें उघड आहे. तेव्हां कोणतेंहि सरकार असो, करभार हा वाढणारच; परंतु दिलेल्या करांचा विनियोग व करांची समाजाच्या घटकांत प्रमाणबद्ध आकारणी ह्या बाबी लोकप्रतिनिधींच्या हातीं असल्या तर कार्य सुकर होईल. प्रांताधिपति व श्री. मुरारजी देसाई ह्या दोघांच्याहि भाषणाचा रोख वाढत्या करभाराकडे आहे, परंतु त्यांतील फरक वर सांगितल्याप्रमाणें महत्त्वाचा आहे.

---

## करांविषयीं चौकशी करण्यासाठी कमिटी

हिंदुस्थानांतील करभाराचें प्रमाण काय पडतें हें अजमावण्यासाठीं हिंदुस्थान सरकार एक कमिटी नेमणार आहे, असें समजतें. हिंदी उद्योगधंद्यांवर करभाराचा परिणाम काय होत आहे, ह्याची चौकशी करविण्यांत यावी, अशी सूचना ऑक्टोबर, १९४५ मध्येंच करण्यांत आली होती. युद्धोत्तर योजना व घटनाविषयक घडामोडी ह्या लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांचेमधील उत्पन्नाची वाटणी कशी असावी, हाहि प्रश्न महत्त्वाचा आहे. ह्या सर्व बाबींचा विचार नियोजित कमिटीकडे सोपविण्यांत येण्याचा संभव आहे.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार २८।१।४६ |
|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९—८—९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २६८०—० |
| ४८०; ३७२ | २३—०—० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४८१—० |
| २२२२-८; १७६३-१२ | २५—०—० † | मार्च—सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २२६२—८ |
| ७०२; ५६६ | ९——० † | मार्च—सप्टें. | कोहिनूर | १०० | ६८९—० |
| ६६८; ५०७ | २२—०—० | मे | स्वदेशी | १०० | ७३४—० |
| ४४३—८; ३६० | ९—०—० S | नोव्हें.—एप्रिल | नागपुर | १०० | ४४६—८ |
| ३३१—८; २७५ | १५—०—० | एप्रिल | फिनले | १०० | ३३१—० |
| | ५—०—० † | ऑक्टो.—एप्रिल | गोकाक | १०० | ३४६—० |
| ३३७; २४३ | ४—०—० † | जाने.—जुलै | सिंप्लेक्स. | ५० | ३५६—० |
| ५; ३-११-० | ०—४—० | मार्च | अपोलो | २ | ४—१२—६ |
| १७-१०; १३-७-० | ०—१५—० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १८——०—० |
| ३-१०; २-९ | ०—३—० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३——९—६ |
| ७९०; ६४५ | ३५—०—० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७७०——० |
| २४३—८; २०६-८ | ७—०—० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २४८—० |
| २५६; २१३-८ | ९—०—० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४६—० |
| ५९२—८; ५१०-० | ७—८—० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६४०—० |
| ४३-७; ३०-१२ | १—४—० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४२-१३ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—७—६ |

मंगळवार दि. २२—१—४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १ पर्यंत चालू आहे.

सोमवार दि. २८—१—४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१—१४ | बरोडा | १६९——८ | आंध्रा व्हॅली | १८४२—८ | अलकॉक | ४५६——४ |
| १९५१—५४ | १०१—१४ | सेंट्रल | ११०——८ | बॉम्बे ट्रॅम | १५८—८ | बाँबे स्टीम | ६५५——० |
| १९५७ | १०१——३ | इंडिया | २३०——० | टाटा हायड्रो | ३१८—८ | न्यू इंडिया | ९५——८ |
| १९५९—६१ | १००—१४ | इंपी० | २४५०—६ | टाटा पॉवर | १९८५—० | शिवराजपुर | ६२——० |
| १९६३—६५ | ९९—१२ | | ६१२—८ | | | टाटा केमिकल | ३५——० |
| १९६६—६८ | ९८—१४ | रिझर्व्ह | १५८—० | | | टाटा ऑईल | ९२——० |
| १९७०—७५ | ९८——७ | युनियन | १२-८ | | | | |

### इंग्लंड व रशिया ह्यांमधील व्यापार सध्यां स्थगित

इंग्लंड व रशिया यांचेमधील व्यापार सध्या खुंटल्यासारखा झाला आहे. कारण, इंग्लंडच्या बोर्ड ऑफ ट्रेडनें रशियांतील व्यापाऱ्यांना त्यांच्या पतीकडे पाहूनच माल देण्याची सूचना केली आहे त्यामुळें इंग्रज व्यापारी रशियन व्यापाऱ्यांना थोड्या फार मुदतीनें उधार माल देण्यास आतां तयार नाहींत. इंग्लंडचे व्यापारी यांचेशी कांहीं राजकीय संबंध नाहीं असें म्हणतात पण रशियन सरकारनें जिम्मा घेतल्याशिवाय मात्र उधार माल पुरविण्यास ते तयार नाहींत. रशियानें त्यामुळें ब्रिटनला सामान पुरविण्याचें अजिबात बंद केलें आहे. रशियाचा लंडनमधील ट्रेड कमिशनर हल्लीं मॉस्कोंत आहे. तो लंडनला परत आल्यावर बोर्ड ऑफ ट्रेडकडे या बाबतींत जोराची तक्रार करणार आहे.

### सरकार हिंदी रेडिओ व केबल कम्युनिकेशन कंपनी खरीदणार

हिंदुस्थान सरकारनें हिंदी रेडिओ व केबल कम्युनिकेशन कं. १ जानेवारी १९४७ ला आपण खरीदणार आहोंत अशी बारा महिने अगाऊ नोटीस कंपनीस १ जानेवारी १९४६ ला दिली. पहिल्या करारनाम्याच्या अटीप्रमाणेंच ही नोटीस आहे.

## NOTICE TO CONTRACTORS.

Sealed Item rate tenders on B-2 Forms are invited for, the work of "Constructing a New Hostel Block for 60 degree students at the College of Engineering Poona" estimated to cost approximately Rs. 1,20,000/-

2. Tender forms will be issued upto the 12th February, 1946, on payment of Rs. 3/- and tenders received upto 3 P. M. on the 14th February 1946.

3. Earnest money of Rs. 1200/- should be paid into the Treasury and the Chalan attached to the tender.

4. Further particulars can be seen in the Office of the Executive Engineer.

Sd/- S. K Karandikar,
Executive Engineer,
Poona Division.

Poona, 28th January 1946.

## "नोटांचे बदली दुसरें चलन देणें" व "नोटांची किंमत देणें" ह्यांत फरक नाहीं

### वटहुकुमानें उपस्थित केलेल्या प्रश्नांचा निवाडा

स्पेसिफिक रिलीफ ॲक्टाच्या ४५ व्या कलमाप्रमाणें, हजार रुपये किंमतीच्या बदलीं १,००० रुपये बिनशर्त देण्याचें रिझर्व्ह बँकेस भाग पाडण्यांत यावें, असा अर्ज डिसोझा ह्यांनीं मुंबई हायकोर्टांत केला होता. "रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटाचें स्वरूप दोन प्रकारचें असतें.ती ( १ ) कायदेशीर चलन असतें व ( २ ) त्याची किंमत देण्याचें बँकेनें वचन दिलेलें असतें. कायदेशीर चलन ह्याचा अर्थ, रिझर्व्ह बँकेनें तिच्या बदली दुसऱ्या कायदेशीर नोटा किंवा नाणीं हीं दिलीं पाहिजेत. हिंदुस्थान सरकारनें वटहुकूम काढला आहे. तो नोटेच्या वरील दोनपैकीं पहिल्या स्वरूपास लागू आहे. परंतु बँकेवर चलनी नोटेची किंमत देण्याची जी मूलग्राही जबाबदारी आहे, ती वटहुकूमानें नष्ट केलेली नाहीं आणि ती किंमत देतांना कोणतीहि अट घालण्याचा बँकेस अधिकार नाहीं" असा अर्जदारातर्फे युक्तिवाद लढविण्यांत आला. "आम्हीं आमच्या नोटेच्या बदली दुसऱ्या नोटा किंवा नाणीं मागत नाहीं; फक्त तिची किंमत मागतों" असा त्याचा अर्थ आहे. "रिझर्व्ह बँक कायद्याच्या सर्व कलमांस वटहुकूम लागू आहे; ज्यांचा कायदेशीरपणा नष्ट झाला आहे अशांच्या बदली दुसऱ्या नोटा देणें व वचन म्हणून त्यांची किंमत देणें ह्यांत श्लेष निघूं शकत नाहीं; वटहुकूम दोन्ही प्रकारांस लागू आहे; वटहुकूमाच्या कायदेशीरपणाचा प्रश्नच उपस्थित करण्यांत आलेला नाहीं, असें सांगून हायकोर्टानें अर्ज नामंजूर केला. त्यावर अपील करण्यांत आलें त्याची सुनावणी गुरुवार ता. २४ रोजीं सर न्यायाधीश व न्या. लोकूर ह्यांचेपुढें झाली. अपील नामंजूर करण्यांत आलें.

### माळशिरस को. सु. युनियन

सोसायट्यांची संख्या ४० असून, ड वर्गामध्यें एकही सोसायटी नाहीं. क वर्गामध्यें अवघ्या ७ सोसायट्या आहेत. व बाकी सर्व अ, ब वर्गांत आहेत. मेंबरांची संख्या २१२१ असून, अहवालाचे सालांत ती २०० नें वाढली आहे. शेअर भांडवल रु. ९५८५८ आहे. यामध्यें वाढ रु. ३३००० नें अहवालाचे सालांत झालेली आहे. बँकेचें व इतर कर्ज रु. २४६०५२ आहे. रिझर्व्ह फंड रु. १००००० आहे. खेळतें भांडवल रु. ५००६०० आहे. मेंबर येणें २५०००० असून, शेंकडा थकबाकीचें प्रमाण १४ पर्यंत आहे. अहवालाचे सालांत युनियन क्षेत्रांत ४ नवीन सोसायट्या निघाल्या. अकलूज येथें नातेपुतें सेल युनियननें आपली शाखा उघडली. आणि धान्य, कापड, साखर, रॉकेल ह्या वाटणीचें काम ८ सोसायट्यांकडे घेण्यांत आलें आणि तीं कामें समाधानकारकपणें सोसायट्यांनीं चालविलीं आहेत. रा. अवचट सुपरवायझर यांनीं त्यावर थोडी देखरेख केली आहे. सध्यां युनियन हद्दींत कर्ज निवारण कायद्याचा प्रचार युनियन बँक व खातें यांचे अधिकारी करीत असून, तो समाधानकारकपणें चाललेला आहे. यासाठीं सेल युनियननें स्वतंत्र पोस्टर काढून तालुक्यांत प्रसिद्धी केली, आणि शेतकऱ्यांचे अर्ज मोफत लिहिण्यासाठी एक पगारी माणूस माळशिरस येथें ठेविला.

### मध्यप्रांतांत विक्रीवरील कर

बंगाल, पंजाब व मुंबई ह्या सरकारांचें अनुकरण करून मध्यप्रांत सरकारहि १ एप्रिल १९४६ पासून आपल्या प्रांतांत विक्रीवर कर बसविणार आहे, असें कळतें.

### वाडा कोऑपरेटिव्ह बँकिंग युनियन लि.

ही संस्था सहकारी कायद्याखाली रजिस्टर झाली असून तिचा उद्‌घाटन समारंभ व पहिली सर्व साधारण सभा ता. १३।१।४६ रोजीं श्री. वैकुंठ ल. मेथा, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई प्रॉ. को. बँक लि. यांचे अध्यक्षतेखाली झाली. सदर प्रसंगीं तालुक्यांतील व जिल्ह्यांतील सुमारें २०० लोक हजर होते. वरील बँकेच्या कामाचें क्षेत्र वाडा तालुका व मोखाडा पेटा असें आहे. ती बँक बँकिंगचे व ट्रेडिंगचे सर्व व्यवहार करील. अशा तऱ्हेचें सहकारी कायद्याखाली रजिस्टर झालेली मुंबई इलाख्यांत ही पहिलीच संस्था आहे. या प्रसंगीं हजर राहतां येत नसल्यामुळें यशाभ्चिंतनपर मे. खानबहादूर काजी कलेक्टरसो. ठाणे, दिवाणसो. जंजिरा स्टेट, मे. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब. को. के. मुंबई व सुरत भाग; प्रो. व्ही. जी. काळे पुणें व रावबहादूर जयंतीलाल शेट ठाणें यांचे शुभ संदेश आले होते. बँकेच्या कामास रीतसर १ फेब्रुवारी १९४६ पासून सुरुवात होईल. ही स्थानिक बँक येथें स्थापनेमुळें मुंबई प्रांताचे को. बँकेचा येथें चालू असलेला व्यवहार या बँकेस घावा लागेल. या बँकेच्या स्थापनेमुळें या भागाची सर्व बाजूनें सुधारणा होण्यास बरीच मदत होणार आहे.

### सटाणा येथील सहकारी कार्यकर्त्यांची सभा

ता. १७।१।४६ रोजीं सटाणा येथील सहकारी कार्यकर्त्यांची सभा मे. शिवराम अजबा पाटील चेअरमन सटाणा ता. को. सुपरवायझिंग युनियन लि. यांचे अध्यक्षतेखाली कर्जनिवारण कायद्यामुळें उत्पन्न झालेली परिस्थिति, सहकारी सोसायट्यांची वसुली सेल सोसायटीमार्फत मालविक्री व त्या बाबतचा जरूर तो प्रचार कसा प्रभावी होईल या बाबतचा विचारविनिमय करण्यासाठीं युनियनच्या ऑफिसांत झाली. युनियन सुपरवायझर मे. डी. आर. वाणी यांनीं सभा बोलावण्याचा उद्देश वगैरे समजावून सांगितला व चालू हंगामाकरितां कामकाजाची दिशा ठरविण्यांत आली.

### मुल्हेर विविध कार्यकारी सोसायटी

मल्हेर विविध कार्यकारी सोसायटीची पहिली साधारण सभा ता. ६।१।४६ रोजीं सायंकाळीं ७ वाजतां मे. माधवराव जहागिरदार यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहानें पार पडली. मे. डी. आर. वाणी सुपरवायझर सटाणा ता. को. सुपरवायझिंग युनिअन यांनीं सोसायटीचें कर्तव्य व सोसायटीचे पोट नियम समजावून सांगून सभेचें कामकाज उत्तम रीतीनें पार पाडण्यास मदत केली. आलेल्या इतर पाहुण्यांचीही समयोचित भाषणें झालीं. सभेंत बऱ्याचशा प्रश्नांचा चर्चात्मक उहापोह होऊन सभा उत्तम रीतीनें पार पडली.

### १९४६ च्या कॅलेंडरांची साभार पोंच

डॉ. वामन गोपाळ सार्सापरिला, मुंबई
रामतीर्थ ब्राह्मी तेल, मुंबई
व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि., पुणें
जी. जे. घैसास, पुणें
नागपूरकर वॉच कंपनी, पुणें
अनाथ विद्यार्थी गृह, पुणें
मागोरा केमिकल कं. लि., पुणें
पंढरीनाथ व्हिलिअन्टाईन, मुंबई
डी. के. सांडू ब्रदर्स, चेंबूर लि., चेंबूर
बंगाल कोल सप्लाईंग फर्म, पुणें
कृष्णा—वेणी छापखाना, लिंब, ( जि. सातारा )

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००

काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००

भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००

खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

शाखा व उपशाखा

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड " | २५ मालेगांव " |
| ३ किर्लोस्करवाडी " | २६ नांदगांव " |
| ४ कोरेगांव " | २७ घोटी " |
| ५ इस्लामपूर " | २८ सटाणा " |
| ६ शिराळें " | २९ येवलें " |
| ७ तासगांव " | ३० मनमाड " |
| ८ वाई " | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद " | ३२ दोंडाईचें " |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार " |
| ११ कल्याण " | ३४ साक्री " |
| १२ पालघर " | ३५ शहादें " |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर " |
| १४ अहमदनगर (" अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें " |
| १५ बेलापूर रोड " | ३८ तळोदें " |
| १६ कोपरगांव " | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी " | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी " | ४१ गोधा " |
| १९ शेवगांव " | ४२ झालोद " |
| २० वांबोरी " | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गाव) " | ४४ नडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद " |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड " |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांसे लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

## ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २



## बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत — किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
मायखळा पुल, नं. २७ मुंबई.



## पैसा आणि ज्ञान वाढवा !


श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्‌भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.



## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७३८२



## पायोनियर डाईंग हाऊस

—दातेवाडी, पुणें—

पक्क्या रंगाचीं कामें करून मिळतात.

रंगाची गॅरंटी हेंच आमचें ध्येय.


हें पत्र पुणें, पेठ मांगुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांगुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.